# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट २५० - २३** **दिनांक : - ०७/०८/२०२३**

## चोरी, घरफोडी चोरी करणाऱ्या गुन्हेगांराना अटक करुन ०४ गुन्हयांची उकल
## नायगाव पोलिस ठाणे - गुन्हे प्रकटिकरण शाखेची कामगीरी

नायगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २८/०७/२०२३ रोजी रात्रौ ०२.२५ वा ते रात्रौ ०३.४५ वा चे फिर्यादी नामे मोहम्मद आबेदीर कमरुद्दीन शेख, वय-४८ वर्षे,रा. रुम नं ०३ सर्वे नं ३९, करमाळपाडा,चिंचोटी, कामन, नायगाव पुर्व, ता.वसई यांच्या रुमची कडी खोलुन दरवाजावाटे आत घरात प्रवेश करुन घरातील लोखंडी कपाटातील सोन्याची चैन व लॉकेट असे ४४,०००/- रुपये किमंतीचे सोन्याचे दागीने चोरी झाल्याबाबतच्या फिर्यादी यांनी तक्रार दिल्याने नायगाव पोलिस ठाणे गुन्हा रजि.नं. २१३/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४५७,३८० प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासादरम्यान तांत्रीक विश्लेषणाचे आधारे तसेच गुप्त बातमीदारा मार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे गुन्हयांचा तपास करुन आरोपीत नामे १) अशिष गणेश ससाणे,वय-२१ वर्षे राहणार- बिलालपाडा, नालासोपारा पुर्व २) प्रविण अशोक गावडे वय-२३ वर्षे राहणार- चिचोंटी, नायगाव पुर्व ता. वसई जि. पालघर,३) महेंन्द्र जयप्रकाश मिश्रा वय-२६ वर्षे राहणार- वाकीपाडा, नायगाव पुर्व यांना अटक करुन त्यांच्याकडे कौशल्याने तपास केला असता त्यांनी वर नमुद गुन्हा केल्याचे निषन्न झाले तसेच त्यांचेकडे अधिक तपास केला असता त्यांनी नायगाव पोलीस ठाण्याचे अभिलेखावरील खालील गुन्हे केल्याचे तपासात निषन्न झाले आहे. अटक आरोपीत यांचेकडुन गुन्हयातील चोरीस गेलेले सोन्याचे दागिने, इतर मुददेमाल व रोख रक्कम, असा **एकुण ८२,०००/- रुपये** किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

**- उघडकीस आलेले गुन्हे —**

| अ.नं. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं व कलम |
|---|---|---|
| १. | नायगाव | I २१३/२०२३ भा.द.वि.सं. कलम ४५७,३८० प्रमाणे |
| २. | नायगाव | I १२१/२०२३ भा.द.वि.सं. कलम ४५४,३८० प्रमाणे |
| ३. | नायगाव | I १५०/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |
| ४. | नायगाव | I २२६/२०२३ भा.द.वि.सं. कलम ४५४,३८० प्रमाणे |

यातील आरोपीत नामे महेंन्द्र जयप्रकाश मिश्रा वय-२६ वर्षे यांच्यावर पुर्वीचे माणिकपुर,नालासोपारा व अर्नाळा पोलिस ठाणे येथे ५ गुन्हे दाखल आहेत.

वरील कामगीरी श्रीमती पौणिमा चौगुले पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, श्रीमती. पदमजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त वसई विभाग , नायगाव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रमेश भामे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. मिलींद साबळे, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे,स.पो.नि.संतोष सांगवीकर, रोशन देवरे, गणेश केकान, पो.उप.निरी. राजेंद्र साबळे, पो.हवा. देविदास पाटील,नितीन पाटील पो.अंम. सचिन मोहीते, सचिन खताळ, जयवंत खंडवी,अमर पवार, चेतन ठाकरे,अशोक पाटील यांनी पार पाडली आहे.

----ooo-----